ePaper

## भाजपावाले चोर आणि लफंगे आहेत: संजय राऊतांचा हल्लाबोल!



वर्ष - 7 । अंक - 8 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- पर्यटन बससेवेच्या मार्गावर दरकपात
- अनधिकृत बांधकामांवर ‘बुलडोझर’
- शरद पवारांचा राजीनामा: एक डाव धोबीपछाड!


www.mahaenews.com | गुरुवार, दि.4 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडला झुकते माप!

## » भाजपाची प्रदेश कार्यकारिणी : मातंग समाजाला प्रतिनिधीत्व नाही

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपाची प्रदेश कार्यकारिणी आज (ता.३) जाहीर झाली. यामध्ये पिंपरी-चिंचवडला यावेळी गतवेळपेक्षा झुकते माप दिले आहे. मात्र, पक्षात नुकताच प्रवेश झालेल्यांना या कार्यकारिणीत स्थान दिल्याने, शहरासह राज्यभरातील भाजपाच्या जुन्या निष्ठावंत पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.**



महिलांना तुलनेने कमी संधी या नव्या कार्यकारिणीत देण्यात आली आहे. तसेच एक पद, एक व्यक्ती या तत्वालाही हरताळ फासला गेल्याचे दिसून आले आहे. कारण या नव्या नियुक्तीतून काहींकडे दोन-दोन पदे आली आहेत. त्यामुळे त्यांचा एका पदाचा राजीनामा पक्ष घेणार का? याकडे आता लक्ष लागले आहे.

दुसरीकडे संघटनकौशल्य असलेल्या जुन्या जाणत्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना डावलण्यात आल्याने ते नाराज झाले आहेत. त्यांच्या नाराजीत आणखी भर पडली ती नुकतेच पक्षात आलेले शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख राम गावडे, शिरूरच्या माजी आमदार जयश्री पलांडे आदींना लगेचच विशेष निमंत्रित सदस्य म्हणून घेण्यात आल्यामुळे, तसेच सर्व समाजाला प्रतिनिधीत्व देण्याचा प्रयत्न झाला असला, तरी मातंग समाज मात्र वंचित राहिला आहे.

शहरातील शंकर जगताप, एकनाथ पवार, संतोष कलाटे, राजेश पिल्ले, अँड. सचिन पटवर्धन आणि अनुप मोरे यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून घेण्यात आले आहे. खाडे हे गत कार्यकारिणीतही होते.

त्या कार्यकारिणीत महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा असलेल्या पिंपरी-चिंचवडकर उमा खापरे या सध्या विधान परिषद सदस्या झाल्या आहेत.

### साबळे, खाडे यांना मानाचे पान!

**» गत कार्यकारिणीत पिंपरी चिंचवडमधील चारजण होते. यावेळी ही संख्या दुप्पट झाली आहे. पावणेचारशे जणांच्या या जंबो कार्यकारिणीत ६४ कार्यकारिणी सदस्य आहेत. सदाशिव खाडे हे उद्योगनगरीतील एकमेव त्यात आहेत. १६ उपाध्यक्षांमध्ये दुसरे पिंपरी-चिंचवडकर आणि माजी राज्यसभा सदस्य अमर साबळे आहेत.**

# शरद पवारांचा राजीनामा अन् विलास लांडे सक्रीय!

## » जयंत पाटील यांच्यासोबत कार्यक्रमात हजेरी : नव्या राजकीय समीकरणाची नांदी

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी अमादार विलास लांडे कमालीचे सक्रिय झाले आहेत. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर संपूर्ण राष्ट्रवादीत खळबळ उडाली असतानाच लांडे मात्र, कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासोबत वावरताना दिसत आहेत.**

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना शरद पवारांचा राजीनामा देण्याचा निर्णय मान्य नाही. पवारांनी आपला निर्णय रद्द करावा या मागणीसाठी जयंत पाटील ढसाढसा रडताना महाराष्ट्राने पाहिले. राजीनाम्याची घोषणा केल्यानंतर प्रसारमाध्यमांसमोर राष्ट्रवादीतील नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे मत शरद पवार यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे, अशा स्वरुपाचे होते. मात्र, त्याचवेळी बहुतांश नेत्यांना शरद पवार यांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी मागणी लावून धरली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले असून, जयंत पाटील पक्षातील



घडामोडींवर प्रचंड नाराज आहेत. दरम्यान, राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींची शरद पवार यांच्या निवास्थानी सिल्व्हर ओक बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीला जयंत पाटील यांना निमंत्रण नव्हते, असे सांगण्यात येते.

तसेच, शरद पवार यांनी फोन केल्यानंतर जयंत पाटील मुंबईला रवाना झाले. तत्पूर्वी, पाटील पुण्यातील कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्यासोबत माजी आमदार विलास लांडे हेसुद्धा होते. विशेष म्हणजे, शरद पवार यांच्या राजीनाम्यानंतर विलास लांडे यांनी सक्षमपणे पक्षाची भूमिका मांडण्यासाठी पुढाकार घेतलेला पाहायला मिळाला. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी थेट चर्चा करीत असतानाच जयंत पाटील यांच्यासोबत ठामपणे असल्याचा सूचक संदेश पक्षश्रेष्ठींना दिल्याचे राजकीय जाणकार सांगतात.

### ... तर जयंत पाटील, विलास लांडे वेगळा विचार करणार?

**» जयंत पाटील आणि विलास लांडे यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात अजित पवार यांनी लांडे यांना पक्षातील निर्णय प्रक्रियेपासून दूर ठेवले. पण, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लांडे यांना कायम साथ दिली आहे. शरद पवार राष्ट्रीय अध्यक्ष नसतील, तर राष्ट्रवादीत दुफळी निर्माण होणार आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील प्रसंगी राजकीय दृष्ट्या टोकाचा विचार करतील. त्यांच्यासोबत लांडे हेसुद्धा राष्ट्रवादीतील नाराजीला मार्ग मोकळा करुन देतील. कारण, गेल्या काही दिवसांपासून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासोबत लांडे यांनी सलोखा निर्माण केला आहे. त्यामुळे आगामी काळात पिंपरी-चिंचवडमध्ये नवे राजकीय समीकरण पहायला मिळाले, तर आश्चर्य वाटायला नको, असेही निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.**

# पर्यटन बससेवेच्या मार्गावर दरकपात!

## पर्यटकांसाठी गुडन्यूजः पुण्यात आता फक्त 500 रुपयांत पर्यटन बससेवा

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुण्यातील सर्व पर्यटन बससेवेच्या मार्गावर तिकीट दरामध्ये सुधारणा करून प्रति प्रवासी तिकीट दर ५०० रुपये इतका करण्यात आला आहे. पर्यटन बससेवेस प्रवासी नागरिकांचा प्रतिसाद न मिळाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, पर्यटन बससेवेचे तिकीट दर जास्त असल्यामुळे पीएमपीएमएल प्रशासनावर तिकीट दर कपातीची नामुष्की ओढवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पुणे दर्शन बससेवेच्या धर्तीवर आणि १६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून धार्मिक व पर्यटन स्थळांकरिता वातानुकूलीत ई-बसेसव्दारे विशेष बससेवा सुरू करण्यात आली आहे. ही १ मेपासून बससेवा प्रत्येक आठवड्याच्या शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या सुरू करण्यात आली आहे.

मात्र, पर्यटन बससेवेस प्रवासी नागरिकांचा प्रतिसाद न मिळाल्याने आणि पर्यटन बससेवेचे तिकीट दर जास्त असल्यामुळे प्रशासनाने तिकीट दर कपातीचा निर्णय घेतला आहे. पुर्वी या बसेससाठी १ हजार रुपये इतके भाडे होते. मात्र, आता ते थेट निम्याने कमी करून ५०० रुपये प्रति प्रवाशी असे करण्यात आले आहे. त्यामुळे जास्त तिकीट दरामुळे प्रवाशांचा अल्पप्रतिसाद मिळत असल्या कारणाने प्रशासनावर तिकीट कपातीची नामुष्की ओढवल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.




### असा असेल पर्यटन बससेवेचा मार्ग आणि सुधारित तिकीट दर

**पर्यटन बससेवा क्र. १**

मार्ग - हडपसर, मोरगांव, जेजूरी, सासवड, हडपसर.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये १,०००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. २**

मार्ग - हडपसर, सासवड सोपानकाका मंदिर, संगमेश्वर मंदिर, नारायणपूर, बालाजी मंदिर (केतकवळे), बनेश्वर मंदिर, कोंढणपूर मंदिर, हडपसर.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये १,०००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. ३**

मार्ग - डेक्कन, खारावडे म्हसोबा देवस्थान, टेमघर धरण, निळकंठेश्वर पायथा, डेक्कन.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये १,०००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. ४**

मार्ग - पुणे स्टेशन, खडकवासला धरण, पानशेत धरण, वरसगांव धरण, पुणे स्टेशन.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये १,०००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. ५**

मार्ग - पुणे स्टेशन, पुलगेट, हडपसर, रामदरा, थेऊर गणपती, प्रयागधाम, हडपसर, पुणेस्टेशन.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ७००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. ६**

मार्ग - पुणे स्टेशन, वाघेश्वर मंदिर (वाघोली), वाडेबोल्हाई, श्री क्षेत्र तुळापूर त्रिवेणी संगम, छ. संभाजी महाराज समाधीमंदिर (वढू बुद्रुक), रांजणगांव गणपती, पुणे स्टेशन.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये १,०००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

**पर्यटन बससेवा क्र. ७**

मार्ग - भक्ती शक्ती निगडी, अप्पूघर, इस्कॉन मंदिर (रावेत), मोरया गोसावी मंदिर (चिंचवड), प्रतिशिर्डी (शिरगांव), देहूगांव, गाथा मंदिर, आळंदी, भक्ती शक्तिनिगडी.

पूर्वीचा प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ७००/-

सुधारित प्रति प्रवासी तिकीट दर – रूपये ५००/-

# स्वारगेट-ठाणे मार्गावर १४ ई-शिवनेरी धावणार!

## पुणे विभागः पहिली ई-शिवनेरी बस स्वारगेट बसस्थानक येथून सुरु

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ई-शिवनेरी व ई-शिवाई बस दाखल झाल्या आहेत. त्यापैकी ई-शिवनेरी बसचे उद्घाटन एक मे रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे झाले. त्यानंतर ठाणे ते मुंबई दरम्यान ई-शिवनेरी बस सुरू करण्यात आली. पुणे विभागातून पहिली ई-शिवनेरी बस स्वारगेट बसस्थानक येथून सुरू करण्यात आली. ती सोमवारी सायंकाळी सहा वाजून ३० मिनिटांनी सुटली. त्यावेळी पुण्यातील एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.**

पुणे विभागाला सात आणि ठाणे विभागाला सात ई-शिवनेरी बस मिळाल्या आहेत. या १४ बस स्वारगेट ते ठाणे धावणार आहेत. स्वारगेट येथून दर अर्ध्या तासाला ठाणेसाठी बस सुरू राहणार आहे. पुण्यात आल्यानंतर स्वारगेट येथील विभागीय कार्यालयात ई-शिवनेरी बस चार्जिंग केल्या जाणार आहेत.



### ई-शिवनेरीची वैशिष्ट्ये

- ई- शिवनेरी बसची क्षमता ४४ प्रवाशांची
- बॅटरी चार्ज केल्यानंतर ३०० किमीचा टप्पा पार करण्याची क्षमता
- ई-शिवनेरी संपूर्ण वातानुकूलित बस
- आरामदायी आसन व्यवस्था
- प्रवाशांना मोबाइल चार्जिंगची सोय
- बॅग ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था
- बसमध्ये सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे
- रिअल टाइम ट्रॅकिंग सिस्टीमची सोय

**असे आहेत तिकीट दर**

पुणे-मुंबईदरम्यान डिझेलवर धावणाऱ्या शिवनेरी बसचे तिकीट ५१५ रुपये आहे; पण डिझेलच्या तुलनेत इलेक्ट्रिक बसची 'ऑपरेटिंग कॉस्ट' कमी आहे. ऑपरेटिंग कॉस्ट कमी असल्याने त्याचा लाभ प्रवाशांना मिळेल अशी अपेक्षा आहे. म्हणजेच तिकीट दर कमी होतील, अशी आशा आहे; पण सध्या तरी ई-शिवनेरीचे तिकीट दर हे ५१५ रुपये इतकेच ठेवण्यात आले आहे.

**पुण्यातून सात बस सुटणार**

स्वारगेट येथून सकाळी ६.४५ वाजता पहिली बस ठाण्याला सुटेल. त्यानंतर दर एक तासाला ई-शिवनेरी बस स्वारगेटवरून सुटणार आहेत. ठाण्यावरून सायंकाळी ६.४५ वाजता शेवटची ई-बस असेल. ती रात्री दहा वाजता पुण्यात दाखल होईल.

# अनधिकृत बांधकामांवर ‘बुलडोझर’

## » महापालिका प्रशासन आक्रमक : एक लाख चौरस फुटावरील बांधकाम पाडले

। पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण कारवाई करण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त(१)प्रदीप जांभळे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आणि शहर अभियंता मकरंद निकम, क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमाकांत गायकवाड तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रणाखाली आज ४ क्षेत्रीय कार्यालयातील सुमारे १,०१,७५० चौरस फुट क्षेत्र इतकी अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यात आली.**

‘फ’ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.११ कुदळवाडी पिंटू यादव चौक ते अमित इंजिनिअरिंग येथे अनधिकृत बांधकाम कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मध्ये १८ पत्राशेडसह एकुण अंदाजे ५३,२५० चौ.फुट अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सदर कारवाई १ उप अभियंता, ४ कनिष्ठ अभियंता, ४ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीटनिरीक्षक) व इतर मनपा कर्मचारी, अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच ५ मनपा पोलिस कर्मचारी, १० स्थानिक पोलिस स्टेशन अधिकारी, कर्मचारी व २७ महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे जवान यांच्या सहाय्याने ६ जेसीबी (१ निडल) तसेच १२ मजुर यांच्या मार्फत कारवाई करणेत आली.



‘ग’ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. २३, २४ थेरगाव मध्ये अनधिकृत बांधकाम निष्कासन कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मध्ये १६ पत्राशेड एकुण अंदाजे ४,८०० चौ.फुट अनाधिकृत बांधकामे निष्कासित केली. सदर कारवाई २ उप अभियंता, ४ कनिष्ठ अभियंता/ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीटनिरीक्षक) व इतर मनपा कर्मचारी व अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच ६ मनपा पोलिस कर्मचारी व ९ पोलिस स्टेशन कर्मचारी यांच्या सहाय्याने ३ जेसीबी (१ निडल), तसेच ३० मजुर यांच्या मार्फत कारवाई करणेत आली.

‘ड’ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वाकड येथील छत्रपती चौक ते मानकर चौक परिसर रोडलगत अनधिकृत बांधकाम करण्यात आली.

### क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत 22 पत्राशेड

**» ‘क’ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत १८ मीटर डि.पी रोड, कुदळवाडी आक्सा इलिगंस् सोसायटी समोर चिखली बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने अनधिकृत बांधकाम कारावाई केली. सदर कारवाई मध्ये २२ पत्राशेडची एकुण अंदाजे ४१,५०० चौ.फुट अनाधिकृत बांधकामे निष्कासित करुन त्वरित मुरुम टाकण्यात आला. सदर कारवाई २ उप अभियंता, ५ कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीटनिरीक्षक) व इतर मनपा कर्मचारी, अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच ५ मनपा पोलिस कर्मचारी, १५ चिखली पोलिस स्टेशन अधिकारी/ कर्मचारी व २० आर.सी.एफ यांच्या सहाय्याने ४ जेसीबी तसेच १५ मजुर यांच्या मार्फत कारवाई करणेत आली.**

सदर कारवाई मध्ये १६ पत्राशेड एकुण अंदाजे २२०० चौ.फुट अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सदर कारवाई ३ उप अभियंता, ३ कनिष्ठ अभियंता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बीटनिरीक्षक) व इतर मनपा कर्मचारी, अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच ५ मनपा पोलिस कर्मचारी, १२ स्थानिक पोलिस स्टेशन अधिकारी, कर्मचारी व १७ महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे जवान यांच्या सहाय्याने २ जेसीबी, १ क्रेन, १ ट्रॅक्टर ब्रेकर तसेच १५ मजुर यांच्या मार्फत कारवाई करणेत आली.

# पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील ब्लॅक स्पॉटची खासदार श्रीरंग बारणे करणार पाहणी

।मावळ ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने महामार्गावरील ‘ब्लॅक स्पॉट’, खंडाळा येथील रस्त्याची केंद्र सरकारच्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष, मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे अधिका-यांसह गुरुवारी (दि.4) पाहणी करणार आहेत.**

पुणे-मुंबई द्रुतगती मावळ मतदारसंघातून जातो. महामार्गावर सातत्याने अपघात घडत आहेत. अपघाताची कारणे जाणून घेण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी खासदार बारणे हे खंडाळा येथे पाहणी करणार आहेत. त्यांच्यासोबत पोलीस अधिकारी, जिल्हा वाहतूक समन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीए आणि एनएचएचे अधिकारी सोबत असणार आहेत.

खासदार बारणे म्हणाले, पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर सातत्याने अपघात होत आहेत. हकनाक लोकांचे बळी जात आहेत. महामार्गावरील अपघाताची कारणे जाणून घेतली जातील. नेमके कशामुळे अपघात होत आहेत, याची माहिती घेतली जाईल. अपघातसत्र रोखण्यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्याचा आढावा घेतला जाईल. याबाबतचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देणार आहे. महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जाणार आहेत.





# माझी वसुंधरा स्पर्धेत पीसीसीओईचा प्रथम क्रमांक

## » आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून कौतूक : ज्ञानेश्वर लांडगेंनी केले अभिनंदन



।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या “माझी वसुंधरा अभियान 3.0” या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) च्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहरातील अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. विजेत्या संघाला सोमवारी (दि.1) महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि 41 हजार रुपयांचा धनादेश देवून गौरविण्यात आले. पीसीसीओई च्या वतीने संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि धनादेश स्वीकारला. यावेळी स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा. संदीप माळी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. दिनेश कुटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी कार्यक्रमाला उपस्थित होते.

### विजेत्या संघाचे अभिनंदन

**» पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.**

# शरद पवारांचा राजीनामा: एक डाव धोबीपछाड!



## भूमिका

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन सगळ्यांनाच धक्का दिला आहे. धक्कातंत्राचा वापर करणं ही शरद पवार यांची जुनी स्टाईल आहे. शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर सुमारे पावणेतीनतास त्यांची मनधरणी पक्षातले नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते करत होते. मात्र शरद पवार यांनी निर्णय मागे घेतला नाही. कुस्तीत पैलवान अनेक डाव-प्रतिडाव खेळतात. मात्र एकाच डावात चीतपट करण्याची खेळी करणारा पैलवान पराक्रमी ठरतो. राजकारणातले तेल लावलेले पैलवान अशी शरद पवारांची ओळख आहे. त्यांनीही अशीच काहीशी खेळी केली आहे.

### धक्कातंत्र ही शरद पवारांची स्टाईल

मंगळवारी मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये जे घडलं त्यानंतर माझं मन थेट २०१४ मध्ये झालेल्या ठाण्यातल्या पत्रकार परिषदेत गेलं. ठाण्यातल्या त्या पत्रकार परिषदेला शरद पवार स्वतः आले होते. ते पत्रकारांसमोर बसले. प्रश्नांना सुरुवात होण्याआधीच शरद पवारांनी मागे पाहून एक खूण केली. त्यानंतर जितेंद्र आव्हाड आनंद परांजपेंना घेऊन सगळ्यांच्या समोर आले. मग शरद पवारांनी पत्रकारांना प्रश्न विचारला की, “यांना तुम्ही ओळखता ना?” त्यावेळी पत्रकारांना कळलं की आनंद परांजपेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. तेव्हा अनेकांना धक्का बसला होता कारण शिवसेनेचे कट्टर शिवसैनिक अशी ओळख असलेल्या प्रकाश परांजपेंचे सुपुत्र आनंद परांजपे हे थेट राष्ट्रवादीत जातील अशी कुणी कल्पना केली नव्हती.

१९७७ मध्ये आणीबाणीनंतर काँग्रेसची दोन शकलं झाली. एक काँग्रेस ओळखली गेली ती म्हणजे रेड्डी काँग्रेस म्हणून तर दुसरी काँग्रेस ओळखली गेली ती इंदिरा काँग्रेस म्हणून. शरद पवार हे तेव्हा रेड्डी काँग्रेससोबत होते. अशात १९७८



ला महाराष्ट्रात शरद पवारांनी पुलोदचा प्रयोग करुन दाखवला होता. महाराष्ट्राचे सर्वात तरुण मुख्यमंत्री होण्याचा लौकिक त्यांनी या प्रयोगातून मिळवला. शरद पवार चारवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री म्हणून असो किंवा केंद्रीय मंत्री म्हणून असो विविध प्रकारची परिस्थिती हाताळण्याची त्यांची हातोटीही कमालीची आहे. त्यांनी आपल्या शैलीतून ते अनेकदा दाखवून दिलं आहे.

### सोनिया गांधींना विरोध आणि फसलेलं बंड

१९९९ ला सोनिया गांधींना विदेशी म्हणून बाहेर पडत त्यांनी काँग्रेसला पुन्हा आव्हान दिलं. मात्र शरद पवार यांचं ते बंड फसलं तरीही हरून न जाता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन करणं, समविचारी म्हणून काँग्रेससोबत जाणं हे सगळं त्यांनी आपल्या हातोटीतूनच साध्य केलं. शरद पवार हे बेरजेचं राजकारण करणारे नेते म्हणून ओळखले जातात. २००४ ला विधानसभेच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला राज्यात सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. तरीही काँग्रेसला मुख्यमंत्रीपद देण्याचं त्यांनी मान्य केलं. युतीचं सरकार गेल्यानंतर आघाडीचं सरकार पुढची १५ वर्षे राहील हे शरद पवारांनी तेव्हाच सांगितलं होतं जे खरंही ठरलं.

### महाराष्ट्राच्या राजकारणावर पकड असलेला नेता

शरद पवार यांच्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत या माणसाने विविध पदं भुषवली. केंद्रातही ते मंत्री होते. तरीही त्यांची महाराष्ट्रावरची पकड कायम राहिली. महाराष्ट्रात एखादी गोष्ट घडण्यामागे शरद पवार कसे असू शकतात? याचे अंदाज आजही बांधले जातात. अशात २०१४ ला जेव्हा भाजपाने बाजी मारली तेव्हाही शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर काढून टाकण्याचं काम शरद पवारांनी लीलया केलं. २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निकालाच्या दिवशीच आम्ही स्थिर सरकारसाठी भाजपाला पाठिंबा द्यायला तयार आहोत असं त्यांनी सांगितलं. भाजपाच्या १२२ जागा आल्या होत्या. शरद पवारांनी २०१४ ला भाजपाला पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली. ज्यामुळे शिवसेनेची कोंडी झाली. पुढची पाच वर्षे शिवसेना भाजपासोबत सत्तेत होती. मात्र राजीनामे खिशात घेऊन. सरकार युतीचं असलं तरीही दोघांमध्ये अस्वस्थता कशी राहील? हा प्रयत्न शरद पवार यांनी पहिल्या दिवसापासून केला होता. त्यानंतर झाला तो महाविकास आघाडीचा प्रयोग.

### महाविकास आघाडी निर्माण करुन भाजपाला आव्हान

२०१९ च्या आधी राज्यात जर कुणी हे सांगितलं असतं की शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस हे तीन पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतील. त्या सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतील तर कुणीही सांगणाऱ्याला वेड्यातच काढलं असतं. मात्र २०१९ ला न भुतो न भविष्यती असा प्रयोग शरद पवारांनी करुन दाखवला.

## संपादकीय »

### ‘भूकंपा’नंतरचे धक्के

***शरद पवार कधी निवृत्त होतील, हे ना कधी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनात आले होते; ना त्यांच्या कट्टर विरोधकांच्या. पवार यांच्या या खेळीनंतर काय, या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या समर्थकांपेक्षाही त्यांचे विरोधकच अधिक उत्सुकतेने शोधत असणार. देशपातळीवर यामुळे काही नवे राजकीय नेपथ्य उभे राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.***

गेले काही दिवस संशयाच्या आणि अस्वस्थतेच्या भोवऱ्यात भिरभिरत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसवर देशातील बुजुर्ग नेते आणि पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी घेतलेला निवृत्तीचा निर्णय एखाद्या तडिताघाताप्रमाणे कोसळला. ‘लोक माझे सांगाती’ या आत्मवृत्ताच्या दुसऱ्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात बोलताना अचानक पवार यांनी ‘आपण पक्षाध्यक्षपदावरून निवृत्त होत असल्याची’ घोषणा करून ‘बॉम्ब’च टाकला होता! पवार गेली ६३ वर्षं राजकारणात आहेत आणि ऐंशीच्या उंबरठ्यावर असताना, त्यांनी अंगावर पावसाच्या सरी झेलत केलेल्या भाषणामुळे या महाराष्ट्र देशीच्या राजकारणालाच एक नवा आयाम मिळाला होता.

**वेळ कुठं आहे मला?’ कामाच्या तगाद्यानं त्रासलेल्या कुठल्याही माणसाच्या तोंडून हेच एक पालुपद आजकाल सतत ऐकायला मिळतं. कुणालाच वेळ म्हणून नाही. वेळ खरंच आक्रसली की काय? प्राकृतिकदृष्ट्या पाहिलं तर अनादी काळापासून, वेळ सतत आपल्या ठराविक वेगानंच धावत आहे. आक्रसलाच असेल तर वेळेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोनच आक्रसलाय. वेळ ही कल्पना समजून घेण्याच्या आपल्या क्षमतेचा संकोच झालाय.**

## आनंद आणि यशप्राप्तीसाठी वेळेचं व्यवस्थापन

आपल्या मनातील असुरक्षितताच याला अंशतः कारणीभूत आहे. या असुरक्षिततेपोटी आपल्याला वाटतं की, अजून आपण काहीच प्राप्त केलेलं नाही. खूप काही करायचं राहूनच गेलंय. यातूनच मग आपल्याला वेळ कमी पडत असल्याची भावना दाटू लागते. ही भावना आपल्या मनाला घोर लावते आणि आपण दुःखी होतो. त्या म्हणीसारखी जणू आपली अवस्था होते : ‘धाव धाव धावला; पण कुठंच नाही पावला.’ महामारी, युद्ध यांसारख्या दोलायमान करून सोडणाऱ्या आपत्तींनी आ वासलेल्या या काळात तर ही असुरक्षितता आणखीच वाढत चाललीय.

पण ही महामारी नसतानाही बहुतेक लोकांच्या दृष्टीनं वेळेचं व्यवस्थापन ही एक मोठी समस्या



आणि आव्हानात्मक जबाबदारी होतीच. आजच्या काळात निवडीला अधिकाधिक वाव मिळत असल्यामुळे तर ही समस्या अधिकच विकोपाला गेली आहे.

जितका निवडीला वाव अधिक तितकं योग्य निवड चुकण्याचं भय अधिक. महत्त्व कशाला द्यावं आणि कशाला देऊ नये याबाबतचे अग्रक्रम ठरवण्याचं शहाणपण अंगी नसल्यानं वेळेचं व्यवस्थापन अधिकाधिक ढिसाळ होऊ लागलं आहे.

आज अनेकजण विविध कामं एकाच वेळी पार पाडताना दिसतात. हा या असुरक्षिततेचाच एक दृश्य परिणाम आहे. आपलं ईप्सित साध्य होणार नाही, आपण मागं पडू या भीतीपोटी एकाच वेळी अनेक कामं करून त्यांना यश मिळवायचं असतं. परिणामी ‘एक ना धड, भाराभर चिंध्या’ अशी अवस्था त्यांच्या पदरी येते. या असुरक्षिततेतून एक प्रकारचं रितेपण माणसाच्या वाट्याला येतं. अजून खूप काही मिळवता आलं असतं अशी रुखरुख त्यांच्या मनाला सततच छळत राहते. आपल्याला खूप काळजी वाटते आणि घोर लागून राहतो. ‘पुरेसा वेळच मिळत नाही’ या आपल्या धारणेचीच ही व्यक्त रूपं असतात.

## ।।अभंगवाणी।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# चोंबडेपणा बंद करा!

## » नाना पटोले स्पष्टच बोलले: संजय राऊतांना बोचऱ्या शब्दात सुनावले"

।मुंबई ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**"राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांनी मंगळवारी पक्षाचे रष्ट्रीय अध्यक्षपद सोडण्यासंदर्भात घोषणा केली. यानंतर संपूर्ण राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघत आहे. यावर अनेक नेत्यांच्या प्रतिक्रियाही येत आहेत. यातच, शिवसेना (उबाठा) नेते संजय राऊत यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. यावेळी, त्यांनी काँग्रेसचे उदारहण देताना, काँग्रेसचे अध्यक्ष खर्गे आहेत, पण निर्णय राहुल गांधीच घेतात, असे वक्तव्य केले होते.**

दरम्यान राऊतांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बोचऱ्या शब्दात राऊतांना सुनावले आहे. ही चोंबडेगिरी संजय राऊतांनी थांबवावी. परवा अजित दादांनीही



तुम्हाला सांगितले आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या पक्षात फार काही चोंबडेगिरी करू नका, असे पटोले यांनी म्हटले आहे. नाना पटोले म्हणाले. संजय राऊत हे काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते नाहीत आणि गांधी कुटुंबावर हे लांछन लावणे म्हणजे, सूर्यावर थुंकण्यासरखे आहे. गांधी कुटुंब हे त्याग करणारे कुटंब आहे.

पंतप्रधान पदासारखे पद त्या कुटुंबाने सोडले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष पद राहुल गांधी यांनी सोडले आहे.

मल्लिकार्जुन खरगे हे आमचे वरिष्ठ नेते आहेत. त्यांचा मोठा अनुभव आहे. ते अनेक वर्ष आमदार आणि खासदार राहिले आहेत. ते ब्लॉक अध्यक्षापासून काम करत आले आहेत. त्यांना संघटनेचा मोठा अनुभव आहे. एवढेच नाही, तर ;मल्लिकार्जून खरगे यांच्या कार्यक्षमतेवर आक्षेप घेणे आणि गांधी कुटुंबावर चुकीचा आरोप करणे, ही चोंबडेगिरी संजय राऊतांनी थांबवावी. हे चुकीचे होईल. अशा पद्धतीने तुम्ही दुसऱ्याचे प्रवक्ते होता. परवा अजित दादांनीही तुम्हाला सांगितले आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या पक्षात फार काही चोंबडेगिरी करू नका, एवढाच आमचा सल्ला त्यांना आहे, असे काँग्रेस प्रेदेशाधक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे."

---

# सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची अध्यक्षपदासाठी चर्चा

## » राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद: एका एका शब्दात प्रफुल्ल पटेलांकडून निकाल!

। मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

शरद पवार यांच्या अध्यक्षपदावरुन पायउतार होण्याच्या घोषणेनंतर राष्ट्रवादीचा पुढचा अध्यक्ष कोण? याबाबत जोरदार चर्चा सुरु आहेत. खासदार सुप्रिया सुळे, अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि जयंत पाटील यांची नावं अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहेत. याच शक्यशक्यतांच्या पार्श्वभूमीवर प्रफुल्ल पटेल यांनी पत्रकार परिषद घेऊन अंदाजांवर आधारित बातम्या करणं थांबवा, असं आवाहन माध्यमांना केलं. तसेच कार्यकर्त्यांनी धीर ठेवावा आणि नेत्यांनी राजीनामे देणं थांबवावं, असं आवाहनही पटेल यांनी केलं. यावेळी सुप्रिया सुळे आणि तुमच्या नावाची अध्यक्षपदासाठी चर्चा असल्याचं पत्रकारांनी विचारल्यावर 'राजकीय चातुर्य' दाखवत प्रफुल्ल पटेल यांनी प्रश्नांचा निकाल लावला.

मुंबईतील वाय बी चव्हाण प्रतिष्ठान येथे आज सकाळी एका



बैठकीचं आयोजन केलं होतं. या बैठकीला जयंत पाटील यांना निमंत्रण नसल्याचं वृत्त माध्यमांनी चालवलं. त्याचवेळी जयंत पाटील यांचा नाराजीचा सूर असल्याचंही बोललं गेलं. याच सगळ्या विषयांवर पत्रकार परिषदेच्या माध्यमातून प्रफुल्ल पटेल यांनी आपली मतं मांडली.

शरद पवार यांच्यासारख्या देशातील मोठ्या नेत्याने एवढा मोठा निर्णय जाहीर केलेला आहे म्हणजे काहीतरी विचार करुन निर्णय घेतला असेल. लोकांच्या, कार्यकर्ते, नेते-पदाधिकाऱ्यांच्या आग्रहास्तव शरद पवार यांनी फेरविचारासाठी दोन-तीन दिवस मागितले आहेत. त्यांनी अजूनही आम्हाला कोणतंही म्हणणं सांगितलं नाही. जर त्यांनी निर्णय फिरवला नाही तर समिती सदस्यांच्या एकमताने आम्ही दुसरा अध्यक्ष निवडू, असं प्रफुल्ल पटेल यांनी सांगितलं.

**सुप्रिया सुळे आणि तुमच्या नावाची अध्यक्षपदासाठी चर्चा**

सुप्रिया सुळे आणि तुमच्या नावाची अध्यक्षपदासाठी चर्चा सुरु असल्याचं पत्रकारांनी विचारल्यावर प्रफुल्ल पटेल म्हणाले, मी सध्या राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदावर काम करत आहे. हे पद माझ्यासाठी गौरवशाली आहे. मुंगेरीलाल के हसीन सपने मी पाहत नाही. मी अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी अजिबात इच्छुक नाही, त्याला मी तयारही नाही. राहिला विषय सुप्रिया सुळे यांचा... तर एका चॅनेलला मुलाखत देताना छगन भुजबळ यांनी ताईंविषयीच्या भावना व्यक्त केल्या. त्या त्यांच्या व्यक्तिगत भावना होत्या... अशा शब्दात त्यांनी चर्चांचे प्रश्न निकाली काढले.

### राष्ट्रवादीतल्या संघर्षामुळे पवारांनी राजीनामा दिला का?

» राष्ट्रवादीत संघर्ष असल्याच्या बातम्या केवळ माध्यमांमधून येतात. राष्ट्रवादीत कोणताही संघर्ष नाही. राष्ट्रवादीत कोणतीही फूट नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकसंध आहे. शरद पवार कायमच सर्वेसर्वा असतील, असं प्रफुल्ल पटेल म्हणाले.

### जयंत पाटील नाराज आहेत का?

**»वाय बी चव्हाण सेंटरमधील बैठकीला पक्षाला माझी गरज वाटली नसेल, असं वक्तव्य आज सकाळी जयंत पाटील यांनी पुण्यात बोलताना केलं. यावरुन जयंत पाटील नाराज असल्याच्या चर्चा सुरु झाल्या. याचप्रश्नावर प्रफुल्ल पटेल म्हणाले, जयंतरावांचा कोणताही वेगळा सूर नाही. ते अजिबात नाराज नाहीयेत. कारखान्याच्या बैठकीच्या निमित्ताने ते पुण्याला गेले होते, संध्याकाळपर्यंत मुंबईत परततील.**

---

# विहिरी कोरड्या, पाण्यासाठी महिलांची २ किमी पायपीट!

। नाशिक।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मे महिन्याच्या सुरुवातीलाच राज्यातील अनेक भागात पाण्याचं दुर्भिक्ष्य निर्माण झालं आहे. विहिरी कोरड्या पडल्या असल्याने ग्रामीण भागातील महिलांना मैलोन् मैल पायपीट करावी लागत आहे. अशातच, नाशिकच्या बोरधापाडा गावातील आदिसावी महिला गेल्या महिन्याभरापासून हंडाभर पाण्यासाठी दोन किमीची पायपीट करत आहेत.

राज्यातील अनेक भागात एप्रिल, मे महिन्यात पाणीटंचाई निर्माण होते. धरणातील साठा संपणे, विहिरी कोरड्या पडणे, पाण्याचे अपुरे नियोजन, टँकर लॉबी आदी विविध कारणांमुळे राज्यातील जनतेला पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागात गावोगावी टँकर उभे राहिलेले दिसतात. मात्र, ज्यांना टँकरने पाणी घेणे खर्चिक असते तिथे पाण्याच्या दुसऱ्या स्त्रोताचा पर्याय शोधला जातो. नाशिकच्या बोरधापाडा येथील आदिवासी महिला हंडाभर पाण्यासाठी तब्बल २ किमीची पायपीट करत आहेत. गावापासून २ किमी अंतरावरील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या विहिरीतील पाणी घेण्यासाठी गावातील महिला भर उन्हातून वणवण करत आहेत. काहीवेळा अपघात होऊन या महिला जखमीही होतात."आमच्या गावात दोन विहिरी आहेत. परंतु, दोन्ही कोरड्या झाल्या आहेत. त्यामुळे २ किमी अंतरावर असलेल्या डोंगराच्या पायथ्यापाशी असलेल्या विहिरीतून आम्हाला पाणी आणावं लागतं. प्रशासनाने आम्हाला लवकरात लवकर मुबलक पाणी द्यावं", अशी मागणी येथील स्थानिक आदिसावी समाजातील महिलांनी केली आहे.



# कर्नाटक निवडणूक: काँग्रेसचे उमेदवार सर्वाधिक कलंकित!

## कर्नाटकात 10 मे रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार

।प्रयागराज महाईन्यूज।

**कर्नाटकात 10 मे रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी राजकीय पक्षांनी पूर्ण तयारी केली असून युद्धपातळीवर प्रचार सुरू आहे. दरम्यान, राजकारण्यांची माहिती देणारी संस्था ADR ने सर्व उमेदवारांबाबत अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार या निवडणूकीत यावेळी काँग्रेसने सर्वाधिक कलंकित आणि करोडपती उमेदवार उभे केले आहेत.**




निवडणुकीसाठी एकूण 2,615 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यापैकी 2,586 उमेदवारांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रांचे मूल्यमापन ADR ने केले आहे. त्या आधारे हा अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यानुसार 2,586 उमेदवारांपैकी 581 म्हणजेच 22 टक्के उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्यातही 404 उमेदवारांवर गंभीर आरोप झाले आहेत.

निवडणूक लढवणाऱ्या 1,087 पैकी 42 उमेदवारांकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक संपत्ती आहे. उमेदवारांची सरासरी मालमत्ता 12.56 कोटी रुपये आहे.

तसेच या रिपोर्टनुसार काँग्रेसच्या 221 उमेदवारांचे विश्लेषण करण्यात आले. त्यापैकी

### श्रीमंतांना तिकीट देण्यात काँग्रेस आघाडीवर

» निवडणूक लढवणाऱ्या 42 टक्के उमेदवारांकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक संपत्ती आहे. करोडपतींना तिकीट देण्यातही काँग्रेस पुढे आहे. काँग्रेसचे 97 टक्के उमेदवार कोट्यधीश आहेत. 96 टक्के भाजप, 82 टक्के JDS, 51 टक्के आम आदमी पार्टी, 56 टक्के NCP, 33 टक्के CPM उमेदवारांकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक संपत्ती आहे. अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारे 24 टक्के उमेदवारही करोडपती आहेत.

122 म्हणजे 55 टक्के उमेदवार असे आहेत ज्यांच्यावर फौजदारी खटले प्रलंबित आहेत.

या बाबतीत भाजप दुसऱ्या क्रमांकावर आहे. भाजपच्या 224 उमेदवारांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करण्यात आले. त्यापैकी 96 म्हणजेच 43 टक्के कलंकित आहेत. JDS चे 34 टक्के, AAP चे 23 टक्के, NCP चे 22 टक्के, CPM चे 33 टक्के उमेदवार कलंकित आहेत.

**उमेदवारांबाबत महत्वाच्या बाबी**

कर्नाटक निवडणुकीत आम आदमी पक्षाने सर्वाधिक 17 महिलांना तिकीट दिले आहे. जेडीएसने 13, भाजपने 12 आणि काँग्रेसने 11 महिला उमेदवार उभे केले आहेत. तर काँग्रेसचे उमेदवार प्रियकृष्ण हे सर्वाधिक कर्जबाजारी आहेत. प्रियकृष्ण यांच्यावर 881 कोटी रुपयांचे कर्ज आहे. निवडणूक लढवणाऱ्या तब्बल 592 उमेदवारांची संपत्ती 5 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे. 49 उमेदवारांवर महिलांवरील गुन्हे दाखल आहेत. तसेच आठ उमेदवारांवर खुनाचा आरोप आहे आणि 35 उमेदवारांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

## पंतप्रधानांकडूनच कर्नाटकाचा अपमान; मल्लिकार्जुन खर्गे



।बंगळूर। महाईन्यूज।

आम्ही देशाच्या पंतप्रधानांचा अपमान करत नाही, तर पंतप्रधानांकडून कर्नाटकाचा अपमान होत आहे, असा उलटवार काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला. गुलबर्गा जिल्ह्यातील आळंद येथील सभेत ते म्हणाले, "राज्यातील ४० टक्के कमिशनमुळे सरकारी कामांचा दर्जा बिघडला आहे. प्रत्येक कामात लाचखोरी आहे. ४० टक्के रक्कम गमावल्यानंतर सामान्य लोक संतापले आहेत. ना खाऊंगा ना खाने दूँगा म्हणणारे मोदी यांनी जनतेचा ४० टक्के पैसा का वाया घालविला, याचा जाब मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना विचारावा."

ते पुढे म्हणाले, "राज्यातील जनतेने काँग्रेसला मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मोदी सहा, आठ वेळा जिल्ह्याचा दौरा करत आहेत. माझा, मुलगा प्रियांक त्यांचा अपमान केल्याचा दावा पंतप्रधान करत आहेत. देशाच्या पंतप्रधानांचा आपण कसा अपमान करू शकतो, तो कोणीही असो, पंतप्रधान आपलाच आहे. तुम्ही कर्नाटकचा अपमान करत आहात.

**'आश्वासने देऊन मते जिंकली'**

मोदी सरकार गरीब महिलांना मोफत सिलिंडर देण्याचे आश्वासन दिले आहे. एकदा फुकट देण्याचे आश्वासन देऊन मते जिंकली आहेत. मोदींच्या काळातच सिलिंडरची किंमत ४०० रुपयांवरून १२०० रुपये झाली आहे. गॅस सिलिंडर आणि दरवाढीमुळे प्रत्येक कुटुंब हादरले आहे, असा संताप खर्गे यांनी व्यक्त केला.

## निसर्गरम्य किनाऱ्याजवळ नको ते उद्योग

### ठोस माहितीनंतर NCBची धाड; लॅबमध्ये काय काय सापडलं?

।पणजी। महाईन्यूज।प्रतिनिधी।

**नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोनं उत्तर गोव्यातल्या अंजुनामध्ये मोठी कारवाई केली आहे. एलएसडी तयार करणाऱ्या प्रयोगशाळेवर एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकली. एनसीबीच्या पथकानं २५ लाख रुपये किमतीचं अमली पदार्थ जप्त करून एकाला अटक केली आहे. अंजुना परिसर पर्यटकांनी कायम गजबजलेला असतो. अंजुनाला सागरी किनारा लाभलेला आहे. या ठिकाणी पर्यटकांची नेहमीच गर्दी असते..**



एनसीबी मुंबईनं दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासादरम्यान २,४६४ एलएसडी ब्लाट (६१.९७ ग्रॅम), १०.४७ ग्रॅम एमडीएमए पावडर, ७६.६ ग्रॅम हशीश मॉईस्ट (नम) पावडर, ६०.५ ग्रॅम हायड्रोपॉनिक ईड (गांजा), ३.४२ ग्रॅम हशीश आणि २५ सायलोसायबिन मशरुम कॅप्सूल (५ ग्रॅम) इतकं साहित्य जप्त करण्यात आलं आहे. त्यांची किंमत २५ लाख रुपयांच्या घरात जाते.

अधिकाऱ्यांनी धाड टाकून ३२ हजार रुपये, १८ डॉलर आणि ३८,२१० श्रीलंकन रुपये जप्त केले आहेत. गोव्यात २८ एप्रिलला अनेक पार्ट्यांमध्ये छापे टाकण्यात आले. तिथून अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता परिसरातील एका अमली पदार्थ निर्मात्याची माहिती मिळाली. अधिकाऱ्यांनी माहिती पडताळण्यासाठी अनेक गोपनीय स्रोत वापरले.

अंजुनातील ए. कुंडू नावाची व्यक्ती अमली पदार्थ तयार करत असल्याची ठोस माहिती एनसीबीच्या अधिकाऱ्यांना मिळाली.

त्यानंतर छापा टाकून कुंडूला अटक करण्यात आली. अमली पदार्थांच्या निर्मितीत हात असल्याची कबुली त्यानं दिली. 'गेल्या काही दिवसांत ड्रग्ज लॅब्सवर छापे टाकण्यात आले. या प्रकरणातील मुख्य निर्मात्यालाच अटक झाल्यानं याचा परिणाम तस्करीवर होईल. आता त्याच्या सिंडिकेटमधील सदस्य, कच्चा माल पुरवठादारांचा शोध सुरू आहे,' असं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे

# रकुलची एक झलक त्यानं केलं असं काही की

बॉलिवूड स्टार्सचे फॅन फॉलोइंग प्रचंड आहे. त्याच वेळी, या स्टार्सचे असे अनेक चाहते आहेत जे त्यांच्यावर मनापासून प्रेम करतात आणि त्यांना भेटण्याची खूप प्रयत्न करतात. बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंगलाही तिच्या हैदराबाद भेटीदरम्यान असाच एक चाहता मिळाला ज्याने तिची झलक पाहण्यासाठी अनेक तास प्रवास केला होता.

रकुल नुकतीच हैदराबादला पोहोचली होती. यादरम्यान तिला पाहण्यासाठी चाहत्यांची गर्दी झाली होती. यातील एका चाहत्याने रकुलला भेटण्यासाठी पाच तासांचा प्रवास केला. जेव्हा रकुलला हे कळले तेव्हा तिला आश्चर्य वाटले. यादरम्यान तिने या चाहत्यासोबत सेल्फीही काढला. त्याचबरोबर अभिनेत्रीला भेटल्यानंतर चाहत्याने तिच्यासोबत काढलेला त्याचा सेल्फी सोशल मीडियावर शेअर केला आहे. तसेच लिहिले, "हॅलो रकुल प्रीत मॅडम मी संपर्क करण्याचा प्रयत्न करत आहे पण आजच्या संभाषणानंतर मी नीट बोलू शकलो नाही. मॅडम धन्यवाद तुमच्यासोबत प्रवास करण्याची, तुमच्यासोबत काम करण्याची अजूनही संधी आहे ही आशा देण्यासाठी मॅडम? ??? मला आशा आहे की तुम्ही माझ्याशी संपर्क साधाल."


रकुलने चाहत्याची ही पोस्ट पाहिल्याबरोबर तिनेही उत्तर दिले आणि लिहिले, "कुर्नूलहून आल्याबद्दल धन्यवाद.. यामुळे मला खूप आनंद झाला."

वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर रकुल प्रीत सिंगकडे अनेक चित्रपट आहेत. ती लवकरच कमल हासनसोबत 'इंडियन 2', पावेल गुलाटीसोबत 'आय लव्ह यू' आणि अनेक अनटाइटेड चित्रपटांमध्ये दिसणार आहे.



# प्रियांकाची ॲक्शन अन् आनंद महिंद्रा शॉक!'

बॉलिवूड ते हॉलिवूड असा प्रवास करणारी अभिनेत्री प्रियांका चोप्राला तिच्या करिअरमध्ये खूप संघर्षाचा सामना करत आज या स्थानावर आहे. प्रियंका नुकतिच मेट गाला या फॅशन इव्हेंटमध्येही दिसली होती. तिचे बरेच व्हिडिओ आणि फोटो अजूनही सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. मात्र अभिनेत्री सध्या तिच्या नवीन वेब सीरिज 'सिटाडेल' मुळे देखील सतत चर्चेत असते. सध्या ती पती निक जोनाससोबत अमेरिकेत राहते.



आता प्रियांकाच्या वेब सीरिजने जागतिक लोकप्रियतेच्या चार्टमध्ये प्रथम स्थान गाठलं आहे. प्रियांका चोप्रा हॉलिवूड वेब सीरिजमध्ये एका गुप्तहेराच्या भूमिका साकारत आहे. मालिकेतील तिच्या जबरदस्त ॲक्शनची खूप चर्चा आहे. ग्लोबल स्टार प्रियांका चोप्राचा 'सिटाडेल' 28 एप्रिल रोजी ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर रिलीज झाला आहे. रुसो ब्रदर्स निर्मित या मालिकेत देसी गर्ल एका गुप्तहेर नादिया सिंगची भूमिका साकारत आहे. आता तर महिंद्रा ग्रुपचे सीईओ आनंद महिंद्रा यांनी देखील प्रियांकाचे कौतुक केले आहे.महिंद्रा समूहाचे अध्यक्ष आनंद महिंद्रा यांनी अलीकडेच प्रियंका चोप्राची टीव्ही मालिका 'सिटाडेल' पाहिली.

# कतरिनाने स्वत:ला मीडियापासून केले दूर

बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ बऱ्याच दिवसांपासून पडद्यावर दिसलेली नाही. ही अभिनेत्री शेवटची 'फोन भूत' चित्रपटात दिसली होती. यासोबतच कतरिनाने लग्नानंतर सार्वजनिक ठिकाणी येणे कमी केले आहे, त्यामुळे तिचे चाहते सोशल मीडियावर अनेक प्रश्न विचारत आहेत.

अभिनेत्री अलीकडेच ईदच्या मुहूर्तावर आयुष शर्मा आणि अर्पिता खानच्या घरी दिसली होती, त्यानंतर तिच्या प्रेग्नेंसीच्या अफवा पसरू लागल्या. यासोबतच असे म्हटले जात होते की, प्रेग्नेंसीमुळे अभिनेत्रीने सार्वजनिक ठिकाणी येणं कमी केलं आहे.

खरं तर, कतरिनाने प्रेग्नेंसी किंवा वैयक्तिक आयुष्यामुळे नव्हे तर तिच्या प्रोफेशनल लाइफमुळे सार्वजनिक ठिकाणी जाणे कमी केले आहे. होय, एका मीडिया रिपोर्टनुसार, अभिनेत्री तिचा आगामी चित्रपट 'टायगर 3' मध्ये खूप व्यस्त आहे. या चित्रपटात अभिनेत्री पुन्हा एकदा सलमान खानसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.चित्रपटामुळे, कतरिनाने सार्वजनिक ठिकाणावर जाणे बंद केलं आहे. जेणेकरून प्रेक्षकांना थिएटरमध्ये तिच्या भूमिकेबद्दल उत्सुकता राहील. अभिनेत्री 'टायगर 3' साठी खूप मेहनत घेत आहे जेणेकरून ती तिच्या चाहत्यांना आश्चर्यचकित करू शकेल. कतरिना शेवटची 'फोन भूत' चित्रपटात दिसली होती. मात्र, बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट प्रेक्षकांना प्रभावित करण्यात अपयशी ठरला. 'पठाण' नंतर शाहरुख खान आणि सलमान खान पुन्हा एकदा 'टायगर 3' मध्ये दिसणार आहेत. किंग खान 8 मे रोजी 'टायगर-3'च्या टीममध्ये या चित्रपटाच्या शूटिंगसाठी सामील होऊ शकतो. शाहरुख आणि सलमानचे चाहते त्यांच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.





# 'तू किंग खान आमच्यामुळे, एवढी गुर्मी बरी नव्हे!'

बॉलीवूडचा किंग खान शाहरुखचा पठाण प्रदर्शित झाला त्याला तुफान प्रतिसाद मिळाला. जोपर्यंत पठाण बॉक्स ऑफिसवर सुरु होता तोपर्यंतच किंग खाननं चांगुलपणाचा आव आणला की काय, असा प्रश्न नेटकऱ्यांनी त्याला विचारण्यास सुरुवात केली आहे. त्याचे कारण सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ खूप काही सांगून जाणारा आहे.किंग खान हा नेहमीच त्याच्या वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. केवळ भारतातच नाहीतर जगाच्या पाठीवर अनेक देशांमध्ये त्याचे चाहते आहेत. त्यामुळे किंग खानसोबत एक सेल्फी घेण्यासाठी चाहत्यांची ओसंडून वाहणारी गर्दी अनेकांना माहिती आहे. त्यावेळी होणारा गदारोळही कित्येकदा सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अशातच विमानतळावर शाहरुखच्या चाहत्यानं त्याच्यासोबत सेल्फी घेण्याचा प्रयत्न केला होता.तो सेल्फी घेत असतानाच शाहरुखनं त्याच्यासोबत जे काही केले त्यामुळे किंग खानवर नेटकऱ्यांनी प्रचंड टीका केली आहे. त्याला खडेबोल सुनावले आहे. शाहरुख आज तू किंग खान आमच्यामुळे आहेस तेव्हा जास्त रुबाब करु नकोस. चाहत्यांसोबत कसे वागायचे हे तुला कळत नाही का, एवढा तुला कसला राग आला असे प्रश्न चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी शाहरुखला विचारले आहेत. त्याचे झाले असे की, शाहरुख विमानतळावर स्पॉट झाला होता.शाहरुख विमानतळावर फोटोग्राफर्सला दिसला आणि त्यांनी फोटो काढण्यासाठी गर्दी केली. यावेळी असंख्य चाहते देखील तिथे होती. त्यांना देखील शाहरुखसोबत फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. त्यापैकी एकानं शाहरुखबरोबर सेल्फी घेण्याचा प्रयत्न केला. शाहरुखला मात्र ते काही आवडले नाही. त्यानं त्या चाहत्याचा हात झटकून

# मोहालीत इशान-सूर्या शो!

## पंजाबवर सहा गडी राखून मुंबईचा दणदणीत विजय, पलटणची विजयी घौडदोड सुरूच

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या ४६व्या सामन्यात मुंबई इंडियन्ससमोर पंजाब किंग्जचे आव्हान होते. दोन्ही संघांमधील हा सामना मोहालीच्या पंजाब क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर संपन्न झाला. सूर्यकुमार यादव आणि इशान किशन यांच्या शतकी भागीदारीने मुंबईला सलग दुसऱ्या सामन्यात दोनशेचा आकडा गाठण्यात यश आले.**

दोघांनी वादळी खेळी करत चौकार-षटकारांची आतिषबाजी केली. मुंबईचा कर्णधार रोहित शर्मने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मुंबईसाठी रोहितचा आयपीएलमधला हा २००वा सामना होता. लियाम लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा यांच्या शतकी भागीदारीच्या जोरावर पंजाब किंग्सने मुंबई इंडियन्ससमोर विजयासाठी २१५ धावांचे डोंगराएवढे आव्हान ठेवले होते ते एमआय पलटणने एक षटक राखून पार केले.

मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्जचा त्यांच्या घरच्या मैदानावर पराभव करत स्पर्धेतील पाचवा विजय मिळवला. मोहाली येथील पंजाब क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर इशान किशन आणि सूर्यकुमार यादव यांनी धडाकेबाज खेळी केल्यानंतर टिळक वर्मा आणि टीम डेव्हिड यांनी स्टाईलमध्ये सामना संपवला. मुंबईचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पंजाबने २० षटकांत ३ बाद २१४ धावा केल्या. मुंबईने १८.५ षटकात ४ गडी गमावत २१६ धावा करत सामना जिंकला.मुंबईसाठी इशान किशन आणि सूर्यकुमार यादव यांनी तिसऱ्या विकेटसाठी ११६ धावांची भागीदारी केली. इशानने ४१ चेंडूत ७५ धावा केल्या. त्याने सात चौकार आणि चार षटकार मारले. त्याचवेळी सूर्यकुमार यादवने ३१ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. त्याने आठ चौकार आणि दोन षटकार मारले.



### 200व्या सामन्यात रोहितची बॅट चालली नाही

**मुंबई इंडियन्सचा कर्णधार रोहित शर्मासाठी हा सामना खास होता. मुंबईसाठी रोहितचा हा २०० वा सामना होता, पण तो फलंदाजीने खास बनवू शकला नाही. तीन चेंडूंचा सामना केल्यानंतर रोहित ऋषी धवनचा बळी ठरला. मात्र, संघाने सामना जिंकून रोहितला या खास प्रसंगी एक अप्रतिम भेट दिली.**

या दोघांशिवाय टिळक वर्मनेही झटपट धावा करत सामना संपवला. तिलकने १० चेंडूत नाबाद २६ धावा केल्या. त्याने एक चौकार आणि तीन षटकार मारले. टीम डेव्हिडने १० चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने १९ धावा केल्या. टिळकने १९व्या षटकातील पाचव्या चेंडूवर षटकार ठोकून सामना संपवला.

तत्पूर्वी, पंजाब किंग्जने मुंबई इंडियन्सला २१५ धावांचे लक्ष्य दिले आहे. त्याने २० षटकांत तीन गडी बाद २१४ धावा केल्या. पंजाबकडून स्फोटक फलंदाज लियाम लिव्हिंगस्टोन आणि यष्टिरक्षक जितेश शर्मा यांनी तुफानी खेळी खेळली. लिव्हिंगस्टोनने ४२ चेंडूत नाबाद ८२ आणि जितेशने २७ चेंडूत नाबाद ४९ धावा केल्या. लिव्हिंगस्टोनने आपल्या खेळीत सात चौकार आणि चार षटकार मारले. त्याचवेळी जितेशने पाच चौकार आणि दोन षटकार ठोकले. पंजाबकडून कर्णधार शिखर धवनने २० चेंडूत ३० आणि मॅथ्यू शॉर्टने २६ चेंडूत २७ धावा केल्या. प्रभसिमरन सिंगला केवळ नऊ धावा करता आल्या. मुंबईकडून पियुष चावलाने दोन बळी घेतले. अर्शद खानने त्याला एक गडी बाद करत साथ दिली.

---

# आयपीएल २०२३: लखनऊ-चेन्नईच्या सामन्यात पावसाचा खोडा

## सामना अनिर्णीत झाल्याने 'प्ले ऑफ'ची चुरस आणखी वाढली

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ चा ४५ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात लखनऊच्या अटल बिहारी वाजपेयी स्टेडियममध्ये होत आहे. सीएसकेनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मैदानात उतरलेल्या लखनऊच्या फलंदाजांची पॉवर प्ले मध्ये दाणादाण उडाली.**

चेन्नईच्या गोलंदाजांनी भेदक मारा करून लखनऊच्या चार फलंदाजांना बाद केलं. केली मायर्स, कर्णधार कृणाल पांड्या, मनन वोहरा आणि मार्कस स्टॉयनिस स्वस्तात माघारी परतले. त्यानंतर पूरनने लखनऊची कमान सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तो बाद झाल्यानंतर एकट्या आयुष बदोनीने धावांचा पाऊस पाडला. त्यामुळे लखनऊने १९.२ षटकात ७ विकेट्स गमावत १२५ धावा केल्या. परंतु, मैदानात पावसाच्या सरी कोसळल्याने सामना अनिर्णीत घोषीत करण्यात आला आणि चेन्नई आणि लखनऊ संघाला प्रत्येकी एक गुण मिळाला आहे. चेन्नई सुपर किंग्जसाठी गोलंदाजांनी चमकदार कामगिरी करून विकेट्स घेतल्या. महिश तिक्षाणाने भेदक मारा करून दोन विकेट्स घेण्याची कामगिरी केली. तिक्षाणाने सलामीवीर फलंदाज मनन वोहराची १० धावांवर असताना दांडी गुल केली. तसंच कर्णधार कृणाल पांड्याला भोपळाही फोडू दिला नाही. पांड्या



शून्य धावा करून झेलबाद झाला आणि लखनऊला मोठा धक्का बसला. रविंद्र जडेजाने आक्रमक फलंदाज मार्कस स्टॉयनिसचा ६ धावांवर असताना त्रिफळा उडवला. तर मोईन अलीने केली मायर्सला १४ धावांवर झेलबाद केलं. त्यानंतर निकोलस पूरनने लखनऊ संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्यालाही मोठी धावसंख्या उभारता आली नाही. पाथिरानाच्या गोलंदाजीवर पूरन ३१ चेंडूत २० धावांवर झेलबाद झाला. मात्र, आयुष बदोनीने चौफेर फटकेबाजी करत ३३ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीनं ५९ धावांची नाबाद खेळी केली.लखनऊ सुपर जायंट्ससाठी युवा फलंदाज आयुष बदोनीने सावध खेळी करून चेन्नईच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. मनन वोहराने ११ चेंडूत १० धावा केल्या. केली मायर्स १७ चेंडूत १४ धावा करून बाद झाला. कर्णधार कृणाल पांड्या शून्यावर बाद झाला. मार्कस स्टॉयनिसलाही धावांचा सूर गवसला नाही. पण आयुष बदोनीने चांगली फलंदाजी करत लखनऊच्या धावसंख्येचा आलेख चढता ठेवला.

---

# मोईन अलीसमोर लखनऊच्या फलंदाजाचे पुन्हा एकदा लोटांगण



। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीग २०२३ मध्ये लखनऊच्या एकना स्टेडियमवर एलएसजीच्या फलंदाजांची चांगलीच दमछाक झाली. लखनऊ सुपर जायंट्सचे फलंदाज बुधवारी चेन्नई सुपर किंग्जच्या फिरकीपटूंविरुद्ध पुन्हा एकदा अडचणीत सापडले. मोईन अली, महेश तिक्षणा आणि रवींद्र जडेजा यांनी शानदार गोलंदाजी करत ११ षटकांत ६१ धावांत ५ बळी घेतले.

या सामन्यात मोईन अलीची कामगिरी उत्कृष्ट राहिली. त्याने १३ धावांत २ बळी घेतले. या मोसमात त्याने आतापर्यंत ९ विकेट घेतल्या आहेत. यातील ६ विकेट लखनऊविरुद्ध घेतल्या आहेत. दुखापतग्रस्त केएल राहुलच्या जागी लखनऊचे नेतृत्व सांभाळत असलेल्या कृणाल पांड्याने लाजिरवाणा विक्रम केला. या सामन्यात कृणाल शून्यावर बाद झाला.

**लखनऊ सुपरजायंट्सविरुद्ध मोईन अलीची कामगिरी –**

मोईन अलीने लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध सलामीवीर काइल मेयर्सची पहिली विकेट घेतली. मेयर्स १७ चेंडूत १४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच्या रुपाने लखनऊला पहिला धक्का बसला. त्यामुळे संघाची धावसंख्या ३.४ षटकात १ गडी बाद ४८ धावा होती. यानंतर त्याने आपल्याच चेंडूवर उत्कृष्ट झेल घेत करण शर्माला पॅव्हेलियनमध्ये पाठवले.